<u>अतितात्काळ /पुरवणी मागण्या प्राथम्य</u>

<u>सन २०१७-२०१८ मधील खर्चाच्या पुरक मागण्या</u>
<u>फेब्रूवारी, २०१८ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन</u>

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग, मंत्रालय,
शासन परिपत्रक क्र. पूरक-२०१८/प्र.क्र.९/अर्थसंकल्प-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १९ जानेवारी, २०१८

<u>परिपत्रक</u>

विधानमंडळाच्या **फेब्रूवारी, २०१८** च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात नेहमीप्रमाणे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ अन्वये चालू वित्तीय वर्षाच्या खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करण्यात येईल. संविधानातील तसेच महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील तरतूदी लक्षात घेता, खाली नमूद केलेल्या बाबीच्या संबंधातील पूरक मागण्या/खर्चाचे पूरक विवरणपत्र विधीमंडळास सादर करण्यात येते.

(अ) आकस्मिकता निधीमधून मंजूर करण्यात आलेल्या वा केल्या जाणा-या रकमांबाबत अद्यापपर्यंत विधानमंडळाला पूरक मागण्या किंवा विनियोजने सादर करण्यात आलेली नाहीत, अशा बाबी.

(ब) न्यायालयाच्या आदेशानुसार तथा भारित स्वरुपाचा खर्च तसेच ज्या नवीन बाबींवरील खर्च विधानमंडळाकडून पूरक मागणीद्वारे मंजूरी मिळाल्यानंतर करण्याचे योजिले असेल अशा बाबी फक्त.

(क) नवीन कामावरील खर्च विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देण्याच्या संबंधातील लाक्षणिक मागण्या.

२. राज्य शासनाने शेतक-यांसाठी विविध प्रकारच्या कर्जमाफी व प्रोस्ताहनपर लाभ देण्याची योजना जाहीर केलेली असून नव्याने लागू झालेल्या वस्तू व सेवा विषयक कायद्यामुळे (GST) शासनास राज्यातील महानगरपालिकांना मोठ्या प्रमाणात भरपाई द्यावी लागणार आहे तसेच वीजसवलत व सिंचन प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आलेली आहे. वरील खर्च हा प्राथम्याने करावयाचा असल्याने शासनाला खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक झाले असून या संदर्भात या विभागाच्या दिनांक ३० जून, २०१७ व दिनांक ०८ ऑगस्ट, २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर बाब लक्षात घेता अत्यंत तातडीचे व अत्यावश्यक अशा बांधील खर्चाचे तसेच न्यायालयीन प्रकरणांचे व केंद्र पुरस्कृत योजनांसदर्भातील खर्चाच्या पुरवण्या मागण्यांचे प्रस्तावावरच विचार विनिमय करणे आवश्यक झाले आहे.

३. उपरोक्त वस्तूस्थिती लक्षात घेता, सर्व मंत्रालयीन विभागांनी वर नमूद केलेल्या बाबीच्या संबंधातील, पुरवणी मागण्यांच्या प्रस्तावाची मराठी व इंग्रजी मधील मजकूराच्या प्रारुपासह (प्रत्येकी २ प्रतीत) तसेच सोबत जोडलेल्या सूचना व कार्यपद्धती अवलंबून **<u>परिशिष्ट अ, ब, क, ड, इ व फ</u>** मधील माहितीसह वित्त विभागाच्या अर्थसंकल्प-२ या शाखेकडे प्रथमत: नोंदणी करणे आवश्यक आहे. यासंदर्भात फेब्रूवारी, २०१८ च्या अधिवेशनामध्ये अंतर्भूत करावयाच्या कार्यक्रम व अनिवार्य खर्चाच्या पुरवणी मागणीसंबंधीचे प्रस्ताव नियोजन (विकास क्षेत्र कार्यक्रम)/सामाजिक न्याय/आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाकडे पाठविण्यासंबंधीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे स्वतंत्ररित्या दिलेले आहे. या वेळापत्रकाप्रमाणे विभागाने तंतोतंत कार्यवाही करावी. विहित वेळेत प्रस्ताव/प्रारुप प्राप्त झाले नाही, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

कार्यक्रम

१)	कार्यक्रमावरील खर्चाचे प्रस्ताव नियोजन/सामाजिक न्याय विभाग /आदिवासी विकास विभाग यांचेकडे अंतिमत: पाठविण्याची कालमर्यादा	१.२.२०१८
२)	कार्यक्रमावरील खर्चाचे प्रस्ताव नियोजन/सामाजिक न्याय/ आदिवासी विकास विभागाकडून वित्त विभागाला (व्यय) सादर करण्याची कालमर्यादा	५.२.२०१८
३)	प्रस्ताव व्यय शाखेकडून अर्थसंकल्प शाखेकडे अंतिमत: प्राप्त होण्याची कालमर्यादा	८.२.२०१८

अनिवार्य

१)	अनिवार्य खर्चाचे प्रस्ताव वित्त विभागास (संबंधीत व्यय शाखा) पाठविण्याची कालमर्यादा	१.२.२०१८
२)	प्रस्ताव व्यय शाखेकडून अर्थसंकल्प शाखेकडे अंतिमत: प्राप्त होण्याची कालमर्यादा	५.२.२०१८
३)	व्यय अग्रक्रम समितीची बैठक	१२.२.२०१८

टिप:- सदरहू पूरक मागण्यांचे प्रस्ताव प्रथमत: अर्थसंकल्प-२, वित्त विभाग, यांचेकडे नोंदविणे अत्यावश्यक आहे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक २०१८०११९१५५६३७३९०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहपत्र - परिशिष्ट अ, ब, क, ड, इ व फ

Vasant K. Patil

Digitally signed by Vasant K. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=FINANCE DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=16a60323ef3beff915e7cf13b9836a7df2ad6df610965aab153a71bdb81c36c1, cn=Vasant K. Patil
Date: 2018.01.19 16:32:41 +05'30'

(व. कृ. पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
२) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
३) प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
४) सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प), सर्व मंत्रालयीन विभाग.
५) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८) अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (वि.सु.), प्रधान सचिव (व्यय), प्रधान सचिव (ले व को.), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक
९) वित्त विभागातील सर्व कार्यासन अधिकारी,
१०) क.अ. (अर्थसंकल्प-४), वित्त विभाग, मंत्रालय,
११) निवड नस्ती, अर्थसंकल्प-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(परिपत्रक क्र. पूरक-२०१८/प्र.क्र.९/अर्थ-३, दिनांक - १९ जानेवारी, २०१८ चे जोडपत्र)

सन २०१७-२०१८ मधील खर्चाच्या पूरक मागण्या (फेब्रूवारी, २०१८ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन) संदर्भात सूचना

१. उपरोक्त परिपत्रकातील परिच्छेद २ मधील वस्तुस्थिती लक्षात घेता अत्यंत तातडीचे व अत्यावश्यक अशा बांधील खर्चाचे तसेच न्यायालयीन प्रकरणांचे व केंद्र पुरस्कृत योजनांसदर्भातील खर्चाच्या पूरक मागण्या प्रस्तावावरच विचार विनिमय करणे आवश्यक आहे.

२. परिच्छेद १ मधील (ब) आणि (क) या संबंधातील ज्या पूरक मागण्यांना व्यय अग्रक्रम समितीची मान्यता आवश्यक आहे, त्या पूरक मागण्यांना मान्यता घेण्याबाबत शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-बीजीटी-१०.२०००/प्र.क्र.५४५/२०००/अर्थसंकल्प-२,दिनांक -३ जून, २००० व क्रमांक-बीजीटी-१००१/प्र.क्र.१५९१/२००१/अर्थसंकल्प-२, दिनांक २६ डिसेंबर, २००१ व क्र.व्यअस-१०.०२/प्र.क्र.६८/ अर्थसंकल्प-२,दिनांक-१ जानेवारी, २००३ अन्वये सुधारित कार्यपध्दती विहीत केलेली आहे.

३. मंत्रालयीन विभागांनी परिपत्रकातील वेळापत्रकानुसार कार्यक्रम व अनिवार्य खर्चाच्या पुरवणी मागण्यांच्या नस्त्या प्रथमत: वित्त विभागाकडे (अर्थसंकल्प-२) नोंदणीसाठी पाठवाव्यात. पुरवणी मागण्यांच्या प्रस्तावासोबतच मजूकरांचे मराठी व इंग्रजी भाषेतील प्रारुप (२ प्रतीत) जोडणे अनिवार्य आहे, याची विभागाने नोंद घ्यावी.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.८८/ अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी, २०१७ नुसार सन २०१७-२०१८ च्या आर्थिक वर्षापासून योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे वर्गीकरण अनुक्रमे अनिवार्य खर्च व कार्यक्रमांवरील खर्च असे करण्यात आलेले आहे. कार्यक्रमांवरील खर्चाच्या प्रस्तावास आवश्यकतेप्रमाणे नियोजन विभाग (विकास क्षेत्र कार्यासन/सामाजिक न्याय विभाग/आदिवासी विकास विभाग) तसेच वित्त विभागाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

५. पुरक मागणीच्या प्रस्तावाच्या नस्तीवरील निर्देशपत्रावरच ठळक अक्षरात पुरवणी मागणी **(फेब्रूवारी, २०१८)** कार्यक्रम व अनिवार्य, आवर्ती/अनावर्ती पुरवणी मागणीची रक्कम व संक्षिप्त विषय ठळक अक्षरात नमूद करणे अनिवार्य आहे. अर्थसंकल्पीय तरतूदी वित्त विभागामार्फत बिम्स (BEAMS) प्रणालीद्वारे online वितरीत करण्यात येतात. त्याच प्रणालीचा वापर करुन सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी **फेब्रूवारी, २०१८** मधील अधिवेशनातील पुरवणी मागण्यांच्या प्रस्तावाची बीम्स (BEAMS) प्रणालीवर प्रथमत: नोंद घ्यावी. या नोंदी संदर्भात सर्व विभागातील अर्थसंकल्पीय कार्यासनांना वेळोवेळी दिलेल्या प्रशिक्षणानुसार पुरवणी मागण्यांच्या मजकुरासह प्रस्ताव online भरुन त्याची प्रिंट आऊट नस्तीस जोडावी. यासंदर्भात मार्गदर्शक सूचना परिशिष्ट-"ड" मध्ये सोबत जोडल्या आहेत. याबाबत विभागांनी त्यांच्या अर्थसंकल्प शाखेची मदत घ्यावी. विभागाच्या अर्थसंकल्प शाखेला काही अडचणी आल्यास त्यांनी वित्त विभागातील अर्थसंकल्प शाखेतील संबंधितांशी (अर्थसंकल्प-४) संपर्क साधावा. Live mode वर पूरक मागण्याचा मजकूर नोंदवून व त्यांची प्रिंट आऊट काढूनच पूरवणी मागण्याचे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

६. वित्त विभागाला प्राप्त होणाऱ्या नस्त्या सर्वसाधारणपणे नोंदणी शाखेत स्विकारल्या जातात. तथापि, पुरवणी मागणी प्रस्तावाच्या नस्त्या अर्थसंकल्प शाखेत प्रथमत: प्राप्त झाल्यास त्याची नोंद घेवून आवश्यक तेथे व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घेणे व मान्य झालेले प्रस्ताव अर्थसंकल्पीय प्रकाशनात अंतर्भूत करणे शक्य होत असल्याने पुरवणी मागण्याच्या नस्त्या, संबंधित कक्ष अधिकाऱ्याने स्वत: प्रत्यक्ष नस्तीसह व वरील सूचनानुसार माहिती परिपूर्ण असल्याची खात्री करुन (निर्देशपत्र तसेच परिशिष्ट "अ" ते "फ"मधील माहितीसह) वित्त विभागाच्या अर्थसंकल्प शाखेतील अर्थसंकल्प-२ या कक्षाकडे विहित करण्यात आलेल्या

वेळापत्रकानुसार कार्यालयीन वेळेत नोंदवून वित्त विभागाला सादर कराव्यात.

७. भारताचे महालेखाकार यांनी मागील आर्थिक वर्षात पुरवणी मागण्या अखर्चित राहिल्या असल्याचा मुद्दा उपिस्थत केला असून विभागांनी पुरवणी मागण्यांचे प्रस्ताव पाठविताना अतिशय अपदावात्मक परिस्थितीमध्ये, वैधानिक बाबी पूर्ण करण्यासाठी, न्यायालयीन आदेशांची अमंजबजावणी करण्यासाठी किंवा अत्यंत अपरिहार्य बाबींसाठी निधी उपलब्ध करणे आवश्यक असेल व हा निधी ३१ मार्च, २०१८ पूर्वीच प्रत्यक्ष खर्ची पडेल तरच पुरवणी मागण्यांचे प्रस्ताव सादर करावेत.

८. विहित कालमर्यादेत कार्यवाही होण्याच्या दृष्टीने पुरवणी मागण्यांच्या प्रस्तावाची छाननी करताना वित्त विभागाने उपस्थित केलेले मुद्दे, इत्यादी बाबतची अधिकची माहिती तात्काळ सादर करुन प्रस्तावास आवश्यक ती माहिती कालमर्यादेत प्राप्त झाली किंवा नाही यांची काळजी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी/ नियंत्रण अधिकाऱ्यांनी घ्यावी. पुरवणी मागणी कार्यक्रमांतर्गत असल्यास घटक निहाय (General / SCSP / STSP) नियतव्यय उपलब्ध आहे किंवा कसे? व त्यास संबंधित घटक निहाय विभागाची मान्यता आहे किंवा कसे? तसेच कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता व पुरवणी मागणीच्या समर्थनाची कारणमीमांसा स्पष्टपणे नमूद करणे अनिवार्य आहे. या कार्यवाही दरम्यान कोणताही प्रस्ताव उपरोक्त उणीवांमुळे अर्थसंकल्पीय प्रकाशनात अंतर्भूत होण्याचे राहू नये, याची दक्षता विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी /नियंत्रक अधिकाऱ्यांनी घ्यावी. संबंधित सहसचिव/उपसचिव यांनी यासाठी स्वत: जातीने लक्ष घालावे.

९. काही विशिष्ट परिस्थितीमध्ये पूर्ण रकमांसाठी पूरक मागण्या सादर करण्याकरीता व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घेण्यात येते. अशा बाबी वगळता सर्वसाधारणपणे परिपत्रकातील परिच्छेद १ मधील बाब (क) मध्ये नमूद केलेल्या पूरक मागण्या या लाक्षणिक रकमांसाठीच असाव्यात. अशा पूरक मागण्या पूर्ण रकमांसाठी सादर करावयाच्या असल्यास त्यासाठी शासन मान्यता व समर्थनीय कारणे नमूद करण्यात यावीत.

१०. नवीन पदनिर्मिती/भरती करणे यानुषंगाने येणाऱ्या आर्थिक भाराची तरतूद करण्यासाठी सादर होणाऱ्या पुरवणी मागणी प्रस्तावाची तपासणी वित्त विभागाच्या दिनांक २५ मे, २०१७, दिनांक ०९ जून, २०१७ व दिनांक २९ जून, २०१७ च्या शासन निर्णयातील सूचनांनुसार करणे आवश्यक राहील.

११. स्थानिक क्षेत्रातील योजना असल्यास त्यानुसार शीर्षाच्या मागण्यांच्या विवरणपत्रात स्पष्टपणे उल्लेख करण्यात यावा.

१२. विधानमंडळास सादर करावयाच्या मागण्यांचा मसुदा नेहमी ज्या स्वरुपात सादर केला जातो त्याच स्वरुपात असावा. यासंदर्भात उदाहरणादाखल मसुदा परिशिष्ठ **"ब"** मध्ये देण्यात आला आहे. पूरक मागण्यांचा मसुदा विभागाच्या सचिवांच्या किंवा विभागाचे प्रभारी मंत्री यांच्या मान्यतेने देण्यात यावा. मुख्य सचिवांच्या दि. १९ नोव्हेंबर, २००७ च्या टिप्पणीनुसार विभागाने पूरवणी मागण्या वित्त विभागाला सादर करण्यापूर्वी विभागाच्या मंत्री महोदयांना अवगत करणे आवश्यक आहे.

१३. या मागण्यांचे सभागृहापुढे समर्थन करावयाचे असल्याने, मागण्यांच्या आवश्यकतेच्या दृष्टीने लागणारा संपूर्ण व योग्य तो संबंधित तपशील अशा मागण्यांच्या मसुद्यात देण्यात यावा. याकरीता विभागांनी प्रत्येक पूरक मागणीच्या शेऱ्यामध्ये याबाबतचा तपशील सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-अ" प्रमाणे द्यावा.

१४. पूरक मागणीच्या प्रत्येक बाबीसोबत "परिशिष्ट-ब" मधील नमून्यात दर्शविल्याप्रमाणे मंत्रालयीन विभागाचे नांव, पूरक मागणीशी संबंधित मंत्र्याचे नाव व पदनाम, अर्थसंकल्पीय अंदाज २०१७-१८ या पुस्तिकेत

दर्शविल्याप्रमाणे संबंधित प्रधान शीर्षांशी संबंधित असलेला पूरक मागणी क्रमांक (म्हणजेच मूळ मागणी क्रमांक) यांचा उल्लेख करुन प्रत्येक बाबीच्या निरनिराळया विहित प्रमाण उद्दिष्टांसाठी तरतूदीची विभागणी दर्शविणारा तपशील द्यावा. तसेच **पुरवणी मागणी प्रस्ताव या सोबत जोडलेल्या विवरणपत्र (FORMAT "F") या नमुन्यातील माहितीसह परिपूर्ण असावा.**

१५. परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी एखाद्या विभागाने पुरवणी मागणी मंजूर करुन घेतली असल्यास त्या नस्तीसह प्रस्ताव पुन्हा पाठवावा. विधानमंडळाला पुरवणी मागण्या सादर करतांना अर्थसंकल्पीय प्रकाशनाद्वारे सादर केल्या जातात. त्यामुळे पुरवणी मागणी मान्यतेबाबतची कोणतीही नस्ती विभागाने स्वत: जवळ ठेवू नये.

१६. पूरक मागण्या सादर करण्यासंबंधीच्या आणि विधानमंडळाच्या इतर कामकाजासंबधीच्या तारखा सर्व विभागांना नेहमीप्रमाणे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांजकडून योग्यवेळी कळविण्यात येतील.

****

परिशिष्ट-अ

(अ)	(अ) मागणीचा विषय व त्या मागणीनुसार कंसात दर्शविलेली मागणीची किंवा विनियोजनाची रक्कम (शेऱ्यामध्ये सुरुवातीलाच देण्यात यावी)
(ब)	बाबींच्या/कार्यक्रमाच्या ठळक वैशिष्टयासह वर्णन.
(क)	प्रस्तावित खर्चाचा पूर्ण तपशिल (निर्माण करावयाची पदे, त्यांची वेतनश्रेणी, खरेदी करावयाच्या सामग्रीचा तपशील इत्यादी व त्याबद्दलचे समर्थन)
(ड)	खर्चास मंजुरी देणाऱ्या शासकीय आदेशांचे क्रमांक व त्यांचे दिनांक
(इ)	हुकूमनाम्यांच्या रकमांच्या संदर्भात दाव्याचा विषय हुकूमनाम्याचा दिनांक यासारखी माहिती, हुकूमनामाच्या रकमेचा तपशील, हुकुमनाम्याची रक्कम देण्यास विलंब झाला असल्यास त्या विलंबाची कारणे व त्यामुळे शासनाचा व्याजापोटी होणारा अतिरीक्त खर्च या सर्व विनियोजनांचा तपशीलात उल्लेख करण्यात यावा.
(फ)	जो अनिवार्य खर्च होणार असेल त्यासंबधीच्या २०१७-२०१८ मध्ये वसूलीच्या रुपाने मिळणाऱ्या रकमा, भारत सरकारकडून किवा भारत सरकारची महामंडळे इत्यादीकडून मिळालेले अनुदान किंवा कर्ज, ज्या लेखाशिर्षांखाली त्या रकमा जमा करावयाच्या असतील ते लेखाशीर्ष व त्यामुळे खर्चात कपात होते किंवा कसे याचा तपशील देण्यात यावा.
(ग)	प्रस्तावित पूरक मागणी संबंधाने नेहमीच्या अर्थसंकल्पात तरतूद का करता आली नाही त्याबद्दल तपशीलवार कारणे.
(ह)	पूरक मागण्यांमध्ये नमूद केलेल्या सर्व बेरजा व हिशोब आणि वेतनश्रेणी इत्यादी तपशील अचूक असतील याबाबत योग्य सावधगिरी बाळगण्यात यावी.
(ई)	पूरक मागण्यांचा मसूदा सादर करतांना त्यामध्ये विभागाने पुढील बाबींचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे.
	(१) वेतन व इतर उद्दिष्टांसाठी प्रस्ताव सादर केला असल्यास आवर्ती, अनावर्ती व एकूण खर्च उद्दिष्टानिहाय नमूद करुन वार्षिक सरासरी खर्चाचा तपशिलही नमूद करावा.
	(२) आकस्मिकता निधी अग्रिमाच्या भरपाईसाठी तसेच उर्वरीत कालावधीसाठी तरतूद करण्याकरीता पूरक मागणीचा प्रस्ताव सादर केला असल्याचे नमूद करुन उर्वरीत कालावधीसाठी लागणाऱ्या तरतूदीचा तपशिलही वरील १ प्रमाणे देण्यात यावा.

<u>परिशिष्ट-ब</u>

(पुरवणी मागणीचा उदाहरणार्थ मसुदा)

विभागाचे नाव - महसूल व वन विभाग

श्री.------------------ मंत्री (महसूल)

पूरक मागणी क्रमांक:-	सी-१ ,			
मुख्य लेखाशीर्ष:-	" २०२९ जमीन महसूल "			
उपमुख्य लेखाशीर्ष:-	(००)			
गौणशीर्ष:-	१०३, भूमी अभिलेख,			
गटशीर्ष:-	(०२) जिल्हा भूमि अभिलेख			
उपशीर्ष:-	(०२)(०१) संचालक, भूमि अभिलेख			
	भारीत (२०२९ ०७८१)			
	दत्तमत (२०२९ ०४२२)			
		आवर्ती रु.	अनावर्ती रु.	एकूण रु.
उद्दिष्टे:-	०१ वेतन			
	११ देशांतर्गत प्रवास खर्च			
	१३ कार्यालयीन खर्च			
	१४ भाडे, पट्टी व कर			
	एकूण:-			

शेरा:- (पूरक मागणीसाठी समर्थन)

सदर पुरक मागणीचा मसुदा विभागाच्या सचिवांनी आणि/किंवा प्रभारी मंत्रीमहोदयांनी मान्य केला आहे.

(स्वाक्षरी सह)

<u>APPENDIX-B</u>

(For example,the draft of supplementary demand)

NAME OF DEPARETMENT - REVENUE AND FOREST DEPARTMENT

Shri.----------------- Minister (Revenue)

Demand No. :-	C-1 ,			
MAJOR HEAD :-	"2029 Land Revenue"			
MINOR HEAD :-	(00)			
GROUP HEAD :-	103, (103) Land Records—			
DETAILED HEAD	(02) District Land Records—			
SUB-HEAD:-	(02) (01) Director of Land Records			
	Charged **(2029 0781)**			
	Voted **(2029 0422)**			
		<u>Rec.Rs</u>.	**<u>Non Rec.Rs.</u>**	**<u>Total Rs.</u>**
OBJECT :-	**01 Object**			
	11 Domestic Travel Expenses			
	13 Office Expenses			
	14 Rent, Rates and Taxes			
	Total Amt:-			

Remarks- (Supply Demand)

Test of the Supplementary is approved by Hon. Minister in Charge and/ of Secretary of the Department.

(SD/-)

कृ.मा.प.

F-18

<u>परिशिष्ट–क</u>

पुरवणी मागणीचा तपशील- फेब्रूवारी-२०१८

१) विभाग	:-
२) नस्ती क्रमांक	:-
३) नस्तीचा ई-ऑफिस क्रमांक	:-
४) विषय	:-
५) कार्यक्रमांतर्गत/अनिवार्य (Schemewise/Committed)	:-
६) मागणी क्रमांक	:-
७) लेखाशीर्ष/संकेतांक	:-
८) अर्थसंकल्पीय तरतूद २०१७-१८ (रुपये लाखात)	:-
९) जुलै, २०१७ पूरवणी मागणी तरतूद (रुपये लाखात)	:-
१०) डिसेंबर, २०१७ पूरवणी मागणी तरतूद (रुपये लाखात)	:-
११) पुनर्विनियोजन (असल्यास)	:-
१२) एकूण अर्थसंकल्पीय तरतूद २०१७-१८ (रुपये लाखात)	:-
१३) आता पर्यंत झालेला खर्च (रुपये लाखात)	:-
१४) शिल्लक तरतूद (रुपये लाखांत)	:-
१५) पुरवणी मागणी रक्कम (रुपये लाखांत)	:-
१६) पुरवणी मागणी रक्कम आवर्ती/अनावर्ती	:-
१७) कार्यक्रमांतर्गत असल्यास नियतव्यय उपलब्ध आहे/नाही	:-
१८) पुरवणी मागणी आवश्यकतेचे कारण (संक्षिप्त)	:-
१९) विभागाच्या संबंधित सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी यांचे नांव व दूरध्वनी क्रमांक	:-

(टिप :- सदर परिशिष्टातील आकडेवारी लाखांमध्ये असावी यादृष्टीने विभागाने काटेकोरपणे तपासणी करावी.)

परिशिष्ट - ड


User Guide for entering Supplementary estimation by administrative departments

1) **Purpose** The guide aims to assist the DS, Budget of the concerned administrative department to fill-up the supplementary estimation on the system and subsequently forward the same to the concerned authority. Please note that the physical file and the detailed noting are not captured / scanned & uploaded on this system. The system aims at capturing the supplementary item text and the demands rose against the item in terms of scheme / object and proposed amount.

2) **URL** – https://beams.mahakosh.gov.in
User Id – admin<dept_code>
Password for draft user – as assigned by department
Password for final user – as assigned by department

3) **Steps to follow –**
   a. Create assistant users (Final)
      i. Create the assistant users as per the division of supplementary creation task e.g. major head wise / scheme wise etc.
   b. Assign specific authority to assistant users (Final)
      i. Authorize the created assistant users to enter the data related specific authority only i.e. for demand number / major head etc.
   c. Create supplementary text (Draft)
      i. Enter the text of supplementary, for supporting the grant proposed.
   d. Create supplementary data (Draft)
      i. Attach scheme-Objects and the corresponding grant proposed for the item created.
   e. Edit supplementary data (Draft)
      i. Change the text or the grant proposed if required. This option is available only till you forward the item.
   f. Forward item (Draft)
      i. Forward the item along with the grant proposed to the Officer in charge.
   g. Query and send back (Final)
      i. Send back the item for any query or corrections to Draft user.
   h. Approve item (Final)
      i. Approve the item and send it to the further level for scrutiny. The physical file will be submitted along with the report generated by the system.

4) **Steps in Detail –**
(Draft) and (Final) indicates the mode of log in.
Please note that same set of assistant users are to be used for distribution and estimation purpose.
   a. Create assistant users (Final)
      i. Select Maintenance -> Assistant user -> Draft
      ii. Create the assistant users as per the division of supplementary creation task e.g. major head wise / scheme wise etc.
   b. Assigns specific authority to assistant users (Final)
      i. Select Maintenance -> Assistant user -> Draft -> Assign authority
      ii. Select the assistant users from the list.
      iii. Authorize the created assistant users to enter the data related specific authority only i.e. for demand number / major head etc.



c. **Selection of keyboard for Marathi text entry.**

   i. Select Estimate -> Supplementary -> Select keyboard.

   ii. Select Phonetic or Inscript for entering Marathi script in the create text option.

d. **Create supplementary text (Draft)**

   i. Select Estimate -> Supplementary -> Create text.


   ii. Enter the text of supplementary for supporting the grant proposed.

   iii. Select / Fill the appropriate data for Demand no., Regular or Token, plan or non-plan, short English description, long English description, short Marathi description and long Marathi description. If plan then select appropriate category of plan type as general or SCP. For Tribal department, plan type is displayed as TSP.

   iv. On save the next item no. is generated automatically by the system for the logged in department.

   v. Enter the details if required for pay scale, major work and minor work table. Note that these tables will be attached to the text entered.

   vi. Enter details of savings in terms of scheme and object. System will cross validate the saving amount entered against the balance available on BEAMS for the specific scheme – object with the department administrator.



e. Create supplementary data (Draft)

i. **Select Estimate -> Supplementary -> Create data of supplementary**

ii. **Select item number.**

iii. **Select major head - scheme-Objects. If it is not available in the displayed list select 'Add New' for adding it to the list.**

iv. **Fill recurring, non-recurring, annual average cost. Fill savings only if the item is proposed for the token supplementary.**

v. **Save the entry.**

f. Edit supplementary data (Draft)

To add new scheme /object to the created item number of the supplementary data before forwarding it to the final user

i. Select Estimate -> Supplementary -> Create data of supplementary.

ii. Select item number.

iii. Select major head - scheme-Objects.

iv. Change recurring, non-recurring, annual average cost and savings as per the requirement.

To update the supplementary data before forwarding it to the final user

i. Select Estimate -> Supplementary -> Forward item.

ii. Select item number.

iii. Select major head - scheme-Objects.

iv. Change recurring, non-recurring, annual average cost and savings as per the requirement.

V. Change the text or the grant proposed if required.

Vi. Change the text or the grant proposed if required.

g. Edit supplementary data of rejected items (Draft)

i. Select Estimate -> Supplementary -> Edit rejected item.

ii. Select item number.

iii. Select major head - scheme-Objects.

iv. Change recurring, non-recurring, annual average cost and savings as per the requirement.

v. Enter justification

h. Forward item (Draft)

i. Select Estimate -> Supplementary -> Forward item

ii. Select item number. Note that ***Planning and Social welfare department*** will view the items created for their department as well as forwarded by other departments for scrutiny. The item will be displayed along with the department code.

iii. Enter justification, manual file number and e-file number if available.

iv. Forward the item along with the grant proposed to the Officer in charge.


Groups For Supplementary Demands 2013-2014									
Dept Code	Item No.	Description	Total Amount	Supplementary Text	Status	E file No.	Manual File No.	Audit	Path
K	2	enter short text	100001.000		Forward Awaited	1/2013-2014/K	1		
N	1	estimation	100001.000		Forward Awaited				

i. Query and send back (Final)

i. Select approve estimate -> supplementary -> Approve item

ii. Enter justification / remark.
iii. Select 'Query and Send back'.
iv. Select View Final and save the entry. The record is again available to the assistant user draft for editing.

j. **Approve Item (Final)**
   i. Select approve estimate -> supplementary -> Approve Item
   ii. The demands entered by the earlier levels are displayed for reference with different colors.
   iii. Edit the data if required.
   iv. Enter the justification.
   v. Approve the item and send it to further level for scrutiny. The physical file will be submitted along with the report generated by the system



5) Work-flow –

a. Assistant user in Draft mode will create / edit the supplementary grant to be proposed
b. Officer in Final mode will edit / approve the items of supplementary grant and forward to Planning department if it is plan item else to finance department if it is a non-plan item.
c. Planning department will further scrutinize plan items. The item will be queried back to the department or will be forwarded to finance department with appropriate justification.
d. Finance department will finally asses the supplementary demand.

Please note that the flow on the system for the initial deployment differs from the actual physical file moment. The flow on the system will be differed for the next implementations.

परिशिष्ट-इ

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तावित पुरवणी मागणी ही अतिशय अपवादात्मक परिस्थितीमध्ये, वैधानिक बाबी पूर्ण करण्यासाठी, न्यायालयीन बाबी पूर्ण करण्यासाठी, व अत्यंत अपरिहार्य बाबीसाठी निधी उपलब्ध करणे आवश्यक असल्याने सादर करण्यात आली आहे, तसेच यासाठी उपलब्ध करण्यात येणारा निधी दिनांक ३१ मार्च, २०१८ पूर्वी पूर्ण खर्ची पडेल याबाबत माझी खात्री झाली आहे.

(विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव)

दिनांक :-

ठिकाण :-

विवरणपत्र (FORMAT "F")

१) विभागाचे नाव

२) योजनेचे नाव व स्वरूप थोडक्यात

३) लेखाशीर्ष

४) कार्यक्रमावरील खर्च/बांधिल खर्च

५) पुरवणी मागणी रक्कम आवती/अनावर्ती

६) कार्यक्रमावरील खर्चांतर्गत असल्यास त्यासाठी नियतव्यय उपलब्ध आहे वा कसे?

७) नियोजन /सामाजिक न्याय / आदिवासी विकास विभागाची मान्यता आहे वा कसे?

८) मागील तीन वर्षाची तरतूद/प्रत्यक्ष खर्च

९) चालू आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतूद, वितरीत - पैकी खर्च

१०) पुरवणी मागणीच्या समर्थनार्थ कारणमीमांसा / तसेच प्रस्तावासंबंधी थोडक्यात माहिती

११) प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढले आहेत काय?

१२) निधी ३१ मार्च पर्यंत खर्च होईल हे विभागाने प्रमाणित करावे. (परिशिष्ट - इ)

१३) निधी आहरीत केल्यावर PLA / बँक खात्यात जमा होणार नाही याची खातरजमा केली आहे काय?

१४) पूरवणी मागणीव्दारे उपलब्ध असलेला निधी विहीत निविदा प्रक्रीया/कार्यपध्दती/वित्तीय अधिकारांच्या मर्यादा/P.W.D. मॅन्युअल/C.V.C. ची मार्गदर्शक तत्वे/प्रचलित शासन निर्णय/नियमानुसार खर्च केला जाणार असल्याचे विभागाचे प्रमाणपत्र.

१५) या कार्यक्रमाच्या संदर्भात महालेखाकारांचे अहवालात/लोलेसच्या अहवालात /स्थानिक लेखा परिक्षणात कोणताही आक्षेप प्रलंबित नाही वा घेतलेला नाही याबाबत विभागाचे प्रमाणपत्र

१६) पुरवणी मागणी — शासनाचे निर्णय /परिपत्रक वित्तीय नियमानुसार आहे किंवा नाही?

१७) ज्या कामासाठी पुरवणी मागणी पाहिजे त्याला प्रशासकीय/वित्तीय मान्यता आहे काय?

१८) ज्या कामासाठी पुरवणी मागणी पाहीजे आहे त्यासाठी यापूर्वी निधी घेतला असल्यास तो PLA मध्ये ठेवण्यात आलेला आहे काय? असल्यास त्या निधीबाबतची मागील महिन्यातील स्थिती दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडावे.

१९) उपरोक्त अ.क्र.१८ मधील बाबीबरोबरच विभागांतर्गतच्या सर्वच PLA खात्यातील निधीची मागील महिन्यातील स्थिती दर्शविणारे एकत्रित विवरणपत्र सोबत जोडावे.

२०) ज्या कामासाठी पुरवणी मागणी पाहिजे आहे त्यासाठी यापूर्वी निधी घेतला असल्यास तो बँक खात्यामध्ये ठेवण्यात आलेला आहे काय? असल्यास त्या बँक खात्यातील निधीबाबतची मागील महिन्यातील स्थिती दर्शविणारे बँकेचे विवरणपत्र सोबत जोडावे.

२१) उपरोक्त अ.क्र.२० मधील बाबीबरोबरच विभागांतर्गतच्या सर्वच बँक खात्यामध्ये निधीची मागील महिन्यातील स्थिती दर्शविणारे एकत्रित विवरणपत्र व बँकाचे विवरणपत्र सोबत जोडावे.

२२) ज्या लेखाशीर्षाखाली पूरक मागणी प्रस्तावित केली आहे. त्या लेखाशिर्षाखाली यापूर्वीची सक्षिप्त देयकांची तपशीलवार देयके प्रलंबित आहेत का? असल्यास ती प्रलंबित राहण्याची कारणे व त्याची सद्यस्थिती.

२३) उपरोक्त अ.क्र.२२ मधील बाबीबरोबरच विभागांतर्गतच्या सर्व सक्षिप्त देयकांची तपशीलवार देयके प्रलंबित असल्याबाबतचे दर्शविणारे एकत्रित विवरणपत्र कारणासह सोबत जोडावे.

२४) पुरवणी मागणीचा विहित नमुन्यातील इंग्रजी व मराठी भाषेतील मसुदा सोबत जोडावा. (२ प्रतीत)

****